**ठळक बातम्या**

- भारतानं विज्ञानाला कायमच देशाच्या प्रगतीशी जोडलं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बातमधून प्रतिपादन

- ख्यातनाम छायाचित्रकार रघु राय यांचं दीर्घ आजारानं निधन

- विदर्भात बहुतांश जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा/ वर्धा, अमरावती आणि अकोला जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट

**आणि**

- आयपीएलमध्ये आज चेन्नई सुपर किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात पहिला तर लखनौ सुपर जायंट्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात दुसरा सामना

**<><><><><>**

भारतानं विज्ञानाला कायमच देशाच्या प्रगतीशी जोडलं असून याच विचारानं आपले शास्त्रज्ञ नागरी अणू कार्यक्रम पुढे नेत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १३३वा भाग होता. काही दिवसांपूर्वीच तामिळनाडूच्या कल्पक्कम इथल्या फास्ट ब्रीडर रिॲक्टरनं क्रिटिकॅलिटीचा टप्पा गाठल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी आजच्या मन की बातमध्ये केला. हे अणू संयंत्र पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानानं तयार करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. हे यश देशाच्या अणू ऊर्जा क्षेत्राच्या वाटचालीतला महत्वाचा टप्पा असल्याचं ते म्हणाले. यासाठी योगदान दिलेल्या सर्वांचं त्यांनी अभिनंदन केलं. यामुळे विकसित भारताच्या संकल्पालाही नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यानिमित्तानं त्यांनी पवन ऊर्जा क्षेत्रातल्या अलिकडच्या यशाबद्दलची माहिती दिली. आता भारताची पवन ऊर्जा निर्मिती क्षमता ५६ गिगावॉटपेक्षा जास्त झाली आहे, गेल्या एका वर्षभराच्या काळात यात सुमारे ६ गिगावॉट नव्या क्षमतेची भर पडली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट - MKB WIND ENERGY**

*(आज भारत पवन ऊर्जा क्षमतेमध्ये जगात चौथ्या स्थानावर पोहोचला आहे, हे आपल्या अभियंत्यांचं, युवा वर्गाच्या परिश्रमाचं तसंच देशाच्या सामूहिक इच्छाशक्तीचं प्रतीक असल्याचं ते म्हणाले.)*

या क्षेत्रात आघाडीवर असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचाही समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं.

येत्या काही दिवसांतच आपण बुद्ध पौर्णिमा साजरी करणार असल्याचं स्मरण करून देत त्यांनी बुद्ध विचारांचं महत्व अधोरेखित केलं. शांततेची सुरुवात आपल्या आतूनच होते आणि स्वतःवर विजय मिळवणं हाच सर्वात मोठा विजय असतो, ही त्यांची शिकवण होती. तणाव आणि संघर्षाच्या स्थिती असलेल्या आजच्या जगात भगवान गौतम बुद्धांचे विचार अधिकच महत्त्वाचे झाले आहेत असं ते म्हणाले.

देशाच्या विविध भागांत निसर्ग आणि वन्यजीव संवर्धनासाठी केल्या जात असलेल्या प्रयत्नांची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली. निसर्ग आणि मानव वेगवेगळे नसून आपण एकमेकांचे सोबती आहोत, ज्यावेळी आपण निसर्गाचा विचार करतो आणि त्याच्या सोबत वाटचाल करतो, तेव्हा बदल स्पष्टपणे दिसून येतो, असं त्यांनी सांगितलं.

तंत्रज्ञानाच्या मदतीनं ऐतिहासिक दस्तऐवजांचे संवर्धन करण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांबद्दलही त्यांनी सांगितलं. भारतीय राष्ट्रीय अभिलेखागारानं एका पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेल्या ऐतिहासिक दस्तऐवजांविषयी

त्यांनी माहिती दिली. नागरिकांनी www.abhilekh-patal.in या संकेतस्थळाला भेट देऊन हे दस्तऐवज पाहावेत, असं आवाहन त्यांनी केलं.

फ्रान्समध्ये झालेल्या युरोपियन गर्ल्स मॅथेमॅटिकल ऑलिम्पियाडमध्ये भारतीय विद्यार्थिनींनी मिळवलेल्या यशाचं कौतुक त्यांनी केलं. या पथकातील मुंबईच्या श्रेया मुंदडा हिचा उल्लेखही त्यांनी केला. देशात मुलींमध्ये ऑलिम्पियाडची संस्कृती वेगानं लोकप्रिय होऊ लागली असून, यासाठी मुलींना पाठबळ देणाऱ्या पालकांचंही त्यांनी कौतुक केलं.

देशात जनगणना २०२७ डिजिटल पद्धतीनं राबवली जात असून, या प्रक्रियेअंतर्गत जनगणनेचे कर्मचारी आपल्याकडे येण्याआधी १५ दिवस नागरिक स्वतः स्वगणनेची प्रक्रिया पूर्ण करू शकतात, अशी माहिती त्यांनी दिली.

भारतानं चीज उत्पादनात केलेल्या प्रगतीबद्दल आणि विविध भागांतील वैशिष्ट्यपूर्ण चीज उत्पादनांबद्दल माहिती त्यांनी दिली. भारताची चव, परंपरा आणि गुणवत्ता जगभरातील लोकांना एक नवा अनुभव देईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

१८५७ चा पहिला स्वातंत्र्यलढा मे महिन्यातच सुरू झाल्याचं स्मरण त्यांनी करून दिलं. या उठावाच्या निमीत्तानं लोकांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करणाऱ्या भारतमातेच्या वीर सुपुत्रांना नमन केलं. मे महिन्याच्या सुट्टीच्या काळात मुलांनी आनंद लुटण्यासोबतच काहीतरी नवीन शिकण्याचा प्रयत्न करावा असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं.

**<><><><><>**

ख्यातनाम छायाचित्रकार रघु राय यांचं आज पहाटे नवी दिल्ली इथं दीर्घ आजारानं निधन झालं. ते ८३ वर्षांचे होते. १८ डिसेंबर १९४२ रोजी तत्कालीन पंजाब प्रांतात ‘झांग’ इथं जन्मलेले रघु राय हे एक स्थापत्य अभियंता होते. पण वयाच्या २३व्या वर्षीच त्यांनी छायाचित्रण करायला सुरुवात केली, आणि १९६६ मध्ये 'द स्टेट्समन' या वृत्तपत्रात प्रमुख छायाचित्रकार म्हणून ते रुजू झाले.

त्यानंतर त्यांच्या कारकिर्दीची पुढली सहा दशकं भारताच्या सामाजिक-राजकीय पटलावरच्या अनेक घडामोडींची साक्ष ठरली.

१९७२ मधली बांगलादेश निर्वासितांची समस्या, १९८४ची भोपाळ वायू दुर्घटना यासारख्या देशाच्या आधुनिक इतिहासातल्या काही अत्यंत संवेदनशील घटना, त्यांनी आपल्या कॅमेरात टिपल्या. ख्यातनाम व्यक्तींच्या छायाचित्रांमधून त्यांनी देशाच्या सामाजिक, राजकीय आणि अध्यात्मिक छटा टिपल्या, आणि या व्यक्तींच्या जीवनाकडे पाहण्याचा आतापर्यंत अज्ञात असलेला नवा दृष्टिकोन सादर केला.

प्रामुख्यानं कृष्ण-धवल माध्यमातल्या आपल्या छायाचित्रांमधून त्यांनी अत्यंत सामान्य गोष्टींनाही असाधारण रूप दिलं. आपल्या प्रदीर्घ, गौरवशाली कारकिर्दीत, राय यांनी भारतातल्या काही आघाडीच्या नियतकालिकांसोबत काम केलं. गेल्या काही वर्षांत, त्यांचे छायाचित्र-निबंध 'टाइम', 'लाईफ', 'द न्यूयॉर्क टाइम्स', 'द इंडिपेंडंट' आणि 'द न्यू यॉर्कर' यांसारख्या जगप्रसिद्ध प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध झाले. ‘रघु रायज इंडिया: रिफ्लेक्शन्स इन कलर अँड रिफ्लेक्शन्स इन ब्लॅक अँड व्हाईट’ तसंच ‘एक्स्पोजर: पोर्ट्रेट ऑफ अ कॉर्पोरेट क्राईम’ यांसारखी काही पुस्तकंही त्यांनी लिहिली.

राय यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या पुरस्कारांनी गौरवण्यात आलं. बांगलादेश युद्ध आणि त्यानंतरच्या घडामोडींच्या वार्तांकनासाठी भारत सरकारनं १९७२ मध्ये त्यांना 'पद्मश्री' पुरस्कारानं सन्मानित केलं गेलं.

रघु राय यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी नवी दिल्लीत लोधी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत.

**<><><><><>**

वर्धा, अमरावती आणि अकोला इथं हवामान विभागाने आज आणि उद्या उष्णतेचा ऑरेंज दिला आहे. नागपूर, चंद्रपूर, बुलढाणा आणि भंडारा इथंही

उष्णतेची लाट येण्याचा अंदाज आहे. पुणे,सातारा, कोल्हापूर इथं आज तुरळक ठिकाणी, आणि सांगली, सोलापूर तसंच मराठवाड्यातील नांदेड, लातूर आणि धाराशीवमधे पुढचे दोन दिवस तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुंबई, ठाणे, रायगड , रत्नागिरी इथं आज हवामान उष्ण आणि दमट राहील. राज्यात बाकी ठिकाणी हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आत्ता थोड्याच वेळात चेन्नई सुपर किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यातल्या सामन्याला सुरुवात होईल. चेन्नईत एम. ए. चिदंबरम मैदानावर होत असलेल्या या सामन्यात गुजरात टायटन्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

स्पर्धेत आज संध्याकाळी लखनौ सुपर जायटन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातही सामना होणार आहे. लखनौच्या अटल बिहारी वाजपेयी मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता हा सामना होईल.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यात शिरपूरमध्ये राबवण्यात आलेलं जलसंधारणाचं मॉडेल राज्यात आदर्श ठरलं असून, आता शिक्षण क्षेत्रातही शिरपूरनं देशपातळीवर ठसा उमटवला आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले आहेत. शिरपूर इथल्या केतकीबेन मुकेशभाई पटेल सेंट्रल लायब्ररीला आज सकाळी मुख्यमंत्र्यांनी भेट दिली. त्यानंतर ते बातमीदारांशी बोलत होते. हे ग्रंथालय विद्यार्थ्यांसाठी ज्ञानकेंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**<><><><><>**

राज्यातल्या आरोग्य सेवेच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विविध समित्यांचं पुनरुज्जीवन करण्याचे निर्देश आरोग्य मंत्री

प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. ते काल मुंबईत आरोग्य विभागाच्या बैठकीत बोलत होते. या प्रक्रियेत स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासनातले अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांचा सहभाग महत्वाचा असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

अकोला जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांना बियाणं, खतं आणि कीटकनाशकं यांची कमतरता भासू नये, याबाबत योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा गीना यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**<><><><><>**

सोलापुर जिल्ह्यात अंबिकानगर इथं बालविवाह रोखण्यात पोलिसांना यश मिळालं. वधुचं वय १३ वर्षं आहे. पोलिसांनी वधु आणि वर पक्षाकडील कुटुंबीयांना बाल विवाह कायद्याबाबत समजावून सांगितलं तसंच दोन्ही परिवारांचं समुपदेशन केलं. अल्पवयीन मुलीला बालकल्याण समितीसमोर हजर करून हा बाल विवाह थांबवण्यात आला.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्याच्या तुमसर तालुक्यातल्या रनेरा गावात काल मध्यरात्री झालेल्या घरफोडीत ८ लाखाचा मुद्देमाल चोरीला गेला. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढचा तपास सुरू आहे.

**//<><><><><>//**